## महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र-उशिप्र.११२५/प्र.क्र.४१सी/ईटी-२०२६/बी.एड -२६/**९०८**/२०२६ दिनांक: **०२ एप्रिल २०२६**

### जाहीर सुचना

**बी.एड सीईटी २०२६**
**(वाहन व्यवस्था- परभणी)**

दिनांक २७/०३/२०२६, २८/०३/२०२६ व २९/०३/२०२६ रोजी **एमजीएम अकॅडमी, परभणी** येथील परीक्षा केंद्रावर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे बी.एड. सीईटी २०२६ ही परीक्षा देऊ न शकलेल्या उमेदवारांसाठीच **रविवार, दिनांक ०५ एप्रिल २०२६** रोजी **दुपारी ०२:०० वा.** पुर्नपरीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर परीक्षा केंद्रावरील बाधित उमेदवारांना **बीड, नांदेड व हिंगोली** या जिल्ह्यांमध्ये नव्याने परीक्षा केंद्रे वाटप करण्यात आलेली आहेत.

सदर उमेदवारांना त्यांच्या परीक्षा केंद्रावर जाणे-येणे साठी सीईटी कक्षामार्फत वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ही वाहन व्यवस्था **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, परभणी बस स्थानकासमोर सकाळी ०७:०० ते ०९:०० वाजेपर्यंत** उपलब्ध असेल. वाहने **सकाळी ०९:०० वाजता सुटतील**. त्यामुळे या सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी निर्दिष्ट वेळेत बस स्थानकावर उपस्थित राहावे.

तसेच परीक्षा संपल्यानंतर संबंधित वाहनांद्वारे उमेदवारांना त्यांच्या परीक्षा केंद्रांवरून परभणी बस स्थानकासमोर परत आणण्यात येईल.

सदर वाहन व्यवस्था केवळ परीक्षार्थी उमेदवारांसाठीच मर्यादित असून, इतर कोणत्याही व्यक्तींना या सुविधेचा लाभ घेता येणार नाही, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**